# Washim District Police

**Nature of Work** :- **Recovery of Missing Child**

**Police Station** :- **Manora**

**Date of Good Work done** :- **11/02/2022**

**Brief of the work done :-**

पोलीस स्टेशन मानोरा येथील रात्र गस्तीवर असलेले पोलीस अंमलदार प्रल्हाद प्रल्हाद तागड व दीपक सोनकांबळे यांना मध्यरात्रीच्या सुमारास एक अल्पवयीन मुलगी दिसली तिची विचारपूस केली असता तिने सांगितले की रागाच्या भरात घरातून निघून आली आहे त्यावेळी रस्त्यावरील पोलिसांनी पालकांचा शोध घेऊन पालकांच्या स्वाधीन केले.

## घरून रागाने जाणाऱ्या मुलीस पोलिसांनी केले आई वडिलांच्या स्वाधीन

देशोन्नती वृत्तसंकलन...

**मानोरा** ▪ पोलीस स्टेशनचे पोलीस कॉन्स्टेबल प्रल्हाद तागड व दीपक सोनकांबळे हे रात्री गस्तीवर असताना गुरुवार दि.१० फेब्रुवारीच्या रात्री सुमारे दोन वाजताच्या दरम्यान मंगरूळपीर रोड वर आमगव्हानच्या समोर त्यांना एक पांढरा ड्रेस घातलेली मुलगी दिसली. मुलीची विचारपुस केली असता घरून रागाने जात असल्याची माहिती दिली. पोलिसांनी मुलींची समजूत काढून तिला आसोला बु.येथे आई वडिलांच्या स्वाधीन केले.

आमगव्हान गावाजवळ रात्री दोन वाजताच्या दरम्यान मंगरूळपीर रस्त्याने एकटी मुलगी पायी जात असतांना गस्तीवर असलेल्या मानोरा पोलिसाना आढळून आली. गाडी थांबवून विचारले असता घरी भांडण झाल्यामुळे मी रागाने चालली आहे. असा सुतावाच केला. मुलीला प्यायला पाणी देऊन दोन मिनिटं शांत थांबून समजूत काढत गावांचे नावाची विचारणा केली असता तीने आसोला बु.सांगितले. असोला बु येथील पोलीस पाटील गोपाल इंगोले यांना फोन करून विचारले असता त्यांनी मुलगी आसोला येतीलच असल्याचे सांगितले. रात्री गस्तीवरील वाहन घेऊन मानोरा पोलीस आसोला बु येथे जाऊन सदर मुलीला आई-वडिलांच्या स्वाधीन केले व आई-वडिलांनी पोलिसांचे आभार मानले. (श.प्र. )